


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १२०, गुरुवार १८ जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेरकरांच्या वैभवात यशाचे शिखर !



पारनेर तालुक्यातील कर्जुले हरेश्वर हे नगर कल्याण हायवे वरील गाव, खरंतर पारनेरच्या वैभवात बारा ज्योतिर्लिंगाची भर घालणाऱ्या हरेश्वरच्या सानिध्याने संपन्न झालेल्या या गावातील राधाबाई व महादू गोविंद जाधव या अध्यात्मिक दाम्पत्याच्या पोटी नारायण महाराज जाधव बाबा यांचा जन्म ८ जानेवारी १९५६ वार रविवार मार्गशिष कृष्ण, सफला एकादशी शके १८७८ रोजी झाला.खरं तर सफला एकादशीला होणारा जन्म ही माऊलींची कल्पकता आणि नियतीची सिद्धत्ता असावी.जाधव परिवार हा पूर्वांपार सधन, संस्कृत आणि वारकरी परंपरेचा पाईक असल्यामुळे डॉक्टर बाबांच्या बालपणापासूनच त्यांना अध्यात्माची गोडी निर्माण झाली परंतु अगदी लहान वयातच बाबांचे पितृछत्र हरपले ज्या वयात वडिलांचा सहवास, प्रेम, माया मिळावी त्या वयातच बाबांचे आपुलकी छत्र दूर झाले परंतु त्यांची ही उणीव त्यांच्या मातोश्री राधाआई,चुलते आनंदराव गोविंदराव जाधव, उच्चशिक्षित विष्णू गोविंदराव जाधव (सर) यांनी भरून काढली आणि या तीन सदहृदयी व्यक्तिमत्त्वांनी बाबांच्या आध्यात्मिक जडणघडणीची पायाभरणी केली.

**गणेश ठोकळ**
**९५५२०५२३८२**

डॉक्टर महाराजांचे प्राथमिक शिक्षण हे त्यांच्या मूळ गावी कर्जुले हर्या येथे झाले तर माध्यमिक शिक्षण हे येथूनच जवळ असणाऱ्या वासुंदे या गावी झाले. उच्चशिक्षणाची सोय जवळ नसल्यामुळे त्यांनी जिल्ह्याच्या ठिकाणी उच्च माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेतला आणि आपले वैद्यकीय शिक्षण-बी ए एम एस देखील नगर मधूनच पूर्ण केले

कुटूंबातील पारमार्थिक वातावरण असल्यामुळे अध्यात्म ज्ञानाचे बाळकडू अगदी लहान वयातच बाबांना प्राप्त झाले. कुटूंबातील वडिलधाऱ्या व्यक्तींना संत वांगमयाची आवड असल्यामुळे आळंदी पंढरपूरच्या साधू संतांचा सहवास सातत्याने डॉ महाराजांना मिळत असे.वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बाबांनी गावापासून जवळच टाकळी ढोकेश्वर येथे स्वतःचा दवाखाना सुरु केला. अतिशय शांत, अध्यात्मिक वृत्ती, मनमिळाऊ स्वभाव, वाणितील गोडवा यामुळे अनेक लोक बाबांच्या वैद्यकीय सेवेला जोडले गेले परंतु बाबांच्यातील अध्यात्मिक भक्ती रस बाबांना शांत बसू देत नसे दवाखान्यातील तपासणीसाठी आलेले पेशंट सोडून बाबा माऊलींच्या भेटीसाठी आळंदीकडे प्रस्थान करत असत आणि तासन तास आळंदीत इंद्रायणी तीरी रमत असत.एकदा आळंदी क्षेत्रातील एक तेजस्वी, ओजस्वी, प्रतिभा संपन्न, संत श्री आनंदाश्रम स्वामी महाराज (ज्यांनी माऊलींच्या मंदिरासमोरील अजाण वृक्षा खाली ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे एक हजार पारायण केले) त्यांच्या सांगण्यावरून तीन वर्ष वैद्यकीय सेवा केलेला दवाखाना बाबांनी बंद करून-

**परिसंतासवे वसंता!योग ज्ञानी पैसता!**
**गुरुचरण उपासिता!वैराग्येसी**

या ज्ञानेशोक्तीप्रमाणे १९ वर्ष आळंदीत माऊलींच्या दरबारी निरंतर सेवा केली. भारतीय तत्त्वज्ञान आणि संस्कृत विषयात एमए उच्चशिक्षित असणाऱ्या बाबांनी वेदांत ज्ञानेश्वरी, विचार सागर, पंचदशी, अमृतानुभव, आणि संत वाङ्मयाचा तौलानिक अभ्यास केला. मागील वीस वर्षापासून वेदांत सत्संग समितीच्या माध्यमातून वारकरी विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्य लोकांना संत वाङ्मयाचा परिचय व्हावा म्हणून ''अष्टादशाह'' या नवीन अभिनव उपक्रमाचा दसरा दिवाळीच्या पावन पर्वकाळात आयोजन करत आहे. आळंदीत अध्यात्माचे धडे घेण्यासाठी येणारा वारकरी विद्यार्थीच आपला ईश्वर आहे हे समजून आपली कोणतीही संस्था उभी न करता जो येईल त्याला अध्यात्म, भक्ती, ज्ञान आणि वैराग्याचे धडे देऊन बाबा त्याला स्वावलंबी आणि परमार्थिक साधक तयार करण्यात आपले जीवन व्यतीत करत आहेत. आजपर्यंत अशा हजारो साधकांच्या रूपाने आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बाबांचे वैचारिक तत्त्वज्ञान पोहोचले असून कितीतरी कीर्तनकर उभे राहिलेत.भगवतगितेच्या प्रत्येक अध्ययावर विस्तृत विश्लेषणात्मक ग्रंथरचना, जीवन एक यात्रा, नाम महिमा, आनंद- रत्नाकर, आपणच सर्वश्रेष्ठ, रामायणामृत, ज्ञानभक्ती- समन्वय यासह 32 ग्रंथरचना साधकांसाठी आणि शिष्य वर्गासाठी ज्ञानाचे अक्षय भांडारच बाबांनी उभे करून ठेवले आहे.महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने संत साहित्य संदर्भात लेखन किंवा संतांना अभिप्रेत असलेल्या मानवतावादी कार्य करणाऱ्या महापुरुषास वारकरी संप्रदायातील अतिशय उच्च प्रतिष्ठेचा ज्ञानोबा तुकोबाराय पुरस्कार दरवर्षी दिला जातो. डॉ बाबांच्या रूपाने हा पुरस्कार यंदा महाराष्ट्र शासनाने डॉक्टर नारायण महाराज यांना समर्पित करून त्यांच्या कार्याची एक प्रकारे जणू दखलच घेतलेली आहे.डॉक्टर नारायण महाराज जाधव यांच्या रूपाने संत निळोबारायांच्या जन्म भूमीत पारनेरकरांच्या वैभवात एक यशाचे शिखर सर झाले आहे.

म्हणून आज पारनेर दर्शन आणि त्यांच्या वाचकांना याचा मनस्वी आनंद होत असून पारनेर दर्शन आणि परिवाराकडून डॉक्टर बाबांना मनःपूर्वक शुभेच्छा तसेच त्यांचे विचार घराघरापर्यंत पोहोचवण्यास पारनेर दर्शन कटिबद्ध राहील.

# ना चर्चा ना विचारणा, तरीही आ. लंके फुल्ल टू चर्चेत !

## राणीताई स्पष्ट तर आ.लंके सावध भूमिकेत

नगर : राजेंद्र त्रिमुखे



**आ. नीलेश लंके हे केवळ जिल्ह्यात नव्हे तर राज्याला परिचित असलेला चेहरा. कोरोना काळात त्यांच्या कामांची चर्चा देश-विदेश पातळीवर होत त्यांच्या कामाची दखल घेतली गेली. मात्र नीलेश लंके हे तसे शांत स्वभावाचे असले तरी चुळबुळे व्यक्तिमत्त्व! शिवसेनेत असताना त्यांनी पारनेर तालुका अध्यक्ष म्हणून गावागावात शिवसेना पोहचवताना आपल्या अभ्यासू, आक्रमक कामातून कार्यतत्पर कार्यकर्ता अशी ओळख निर्माण केली. स्थानिक नेत्यांशी मतभेद झाल्याने त्यांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाला थेट पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या जाहीर सभा कार्यक्रमा दरम्यानच एल्गार पुकारले आणि चर्चेत आले. नीलेश लंके हे व्यक्तिमत्त्व तेंव्हापासून जिल्ह्यात चर्चेत राहिले ते आजतागायत.**

शिवसेनेतून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेस कडून नीलेश लंकेनी निवडणूक लढवली ती आपल्याच पूर्वाश्रमीच्या शिवसेना पक्षाविरोधात! सलग तीन वेळेस आमदार असलेले आणि विधानसभा उपाध्यक्ष असलेले विजय औटींचा पराभव करत २०१९ ला जिल्ह्यात विक्रमी मतांनी नीलेश लंके आमदार झाले आणि पुन्हा चर्चेत आले. मधल्या कोरोनाकाळात त्यांच्या माध्यमातून कोरोना रुग्णांची झालेली सेवा तर देशभर दखलपात्र झाली, त्याही वेळी आ.लंके प्रसिद्धी आणि चर्चेच्या झोतात राहिले. मधल्या काळातही आमदर असलेले लंके कधी रस्त्यावर उभा राहून जॅम झालेली ट्राफिक मोकळी करतानाचे त्यांचे व्हिडीओ दिसून आले. अडचणीत असलेल्या आणि मदत मागायला आलेल्या व्यक्तीला त्यांनी ना जाती-पातीचा ना आपल्या-परक्या पक्षाचा म्हणून नाकारले, म्हणून नेते जिथे उभे असतील तिथे त्यांचा जनता दरबार दिसून येतो. या जनता दरबारातून ते अनेकांची कामे लीलया मार्गी लावतात असे त्यांचे कसब आहे.

आता आ. नीलेश लंके यांच्या बद्दल सर्व माहीत असलेले पुन्हा सांगण्याचे कारण म्हणजे लंके पुन्हा एकदा चर्चेत आणि माध्यमांच्या कॅमेऱ्यात आलेत ते म्हणजे ते अथवा त्यांच्या पत्नी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके यांच्या संभाव्य लोकसभा निवडणुकीत इच्छुक असलेल्या बातम्या आणि चर्चेमुळे! एकीकडे राणीताई लंके या शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने सुरुवातीपासून माध्यमांशी बोलताना आम्ही लोकसभेची निवडणूक लढवणारच, समोर कोणीही उमेदवार असला तरी आम्हां दोघांपैकी एक लोकसभा निवडणुक लढवणारअसे त्यांनी सांगितले. मुळात आ. नीलेश लंके हेच लोकसभा निवडणूक लढवतील अशी अटकळ असताना नंतर राणीताई लंके यांचे नाव शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने पुढे आले.

राणीताई लंके यांच्या वक्तव्याने पुन्हा एकदा आ.लंके चर्चेत आले. यावर आ.लंके यांची भूमिका काय असा प्रश्न साहजिकच ते महायुतीत असलेल्या अजित पवार गटासोबत असल्याने पुढे आला. मात्र दरम्यानच्या काळात लंके हे घरगुती कारणास्तव बाहेरगावी असल्याने त्यांची प्रतिक्रिया कळू शकत नव्हती. मात्र दुसरी कडे शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने प्रत्येक तालुक्यात आणि गावोगावी पत्रकारांनी विचारल्या नंतर राणीताई लंके यांनी लोकसभा लढवणार असल्याचे निसंदिग्ध शब्दात सांगितले. मात्र कालांतराने त्यांचा सूर काहीसा बदलत कोणीही उमेदवार समोर असला तरी या वरून आ.लंके आणि वरिष्ठ देतील त्यानुसार असा होत गेला. मंगळवारी शिवस्वराज्य यात्रेचा समारोप नगर शहरात जोरदार झाला. याही वेळी पत्रकारांना त्यांनी सावध भूमिका घेत शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने लोकांमधून आम्ही लोकसभा निवडणुक लढवावी अशी मागणी असल्याचे सांगत या उमेदवारीबाबत आ.लंके आणि वरिष्ठ घेतील अशी भूमिका त्यांनी घेतली. बरं, वरिष्ठ अजितदादां की शरद पवार साहेब, या प्रश्नावर त्यावर मला आता काही सांगता येणार नाही अशी संदिग्ध भूमिका त्यांनी मांडली. एकूणच राणीताई लंके लोकसभा निवडणूक लढवण्याच्या पूर्ण तयारीत असल्याचे दिसत असले तरी अंतिम निर्णय मात्र आ.निलेश लंके आणि त्यांचे वरिष्ठ यांच्या हातात असल्याचे पुढे आले आहे. मुख्य म्हणजे हे वरिष्ठ कोण याची उत्सुकता असली तरी ती दूर होण्यास अजून काही अवधी लागणार हे निश्चित! एकीकडे राणीताई यांची स्पष्टीकरण देताना भूमिका बदलली असली तरी त्यांनी लोकसभा निवडणुकीस आम्ही इच्छुक असल्याचे एव्हढे मात्र निश्चित सांगितले आहे.

विशेष म्हणजे शिवस्वराज्य यात्रेच्या प्रारंभा पासून समारोप होई पर्यंत आ. नीलेश लंके कुठेही यात्रेत उपस्थित नव्हते. यासाठी त्यांनी घरगुती दुःखद घटनेचे कारण नाकारता येणार नाही. मात्र असे असताना निघालेल्या यात्रेत त्यांना इंटरफेअर करायचा नसला आणि शक्य नसले तरी यात्रेच्या निमित्ताने राणीताई लंके यांची लोकसभे बाबतची स्पष्ट भूमिका त्याबद्दल ते अनभिज्ञ होते आणि हे सर्व प्रसिद्ध झालेल्या बातम्यांतुन त्यांना समजले ही त्यांची भूमिका राजकीय दृष्टीने सूचक समजली जात आहे.

शिवस्वराज्य यात्रेच्या समारोपाला आमदार लंके अनुपस्थित असले तरी ते नगर मध्येच आपल्या कार्यालयात नगर तालुक्यातील नागरिकांच्या गाठीभेटी घेत त्यांच्या समस्या सोडवण्यात व्यस्त होते. महायुतीच्या मेळाव्याला असेच चित्र दिसून आले. मेळाव्यासाठी आपल्याला भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी निरोप दिल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र आ. लंके राष्ट्रवादी अजित पवार गटात आहेत, तेंव्हा राष्ट्रवादी पक्षाचे महायुतीचे समन्वयक आ.संग्राम जगताप यांनी त्यांना वा इतर अनुपस्थित राष्ट्रवादीचे आ.किरण लहामटे आणि आ.आशुतोष काळे यांना निरोप दिला होता किंवा काय नाही याबद्दलची शंका साहजिक उपस्थित होणारी आहे. असे असेल तर महायुती बरोबरच पक्षांतर्गत समन्वय आहे किंवा नाही यावरही शंका उपस्थित होऊ शकते.

राणीताई लंके यांच्या शिवस्वराज्य यात्रेच्या समारोपानंतर माध्यम प्रतिनिधींनी आ. लंके यांना त्यांच्या नगर मधील कार्यालयात गाठून एकूणच शिवस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने पुढे येत असलेल्या राणीताई लंके यांच्या भूमिकेमुळे राणीताई लंके किंवा आपण लोकसभा निवडणूक लढवणार का असा प्रश्न केला असता आमदार लंके यांनी राणीताई लंके यांनी काढलेली शिवस्वराज्य यात्रा हा त्यांनी आयोजित केलेला कार्यक्रम होता, यादरम्यान मी घरगुती कारणास्तव इंदोर येथे होतो असे सांगितले. मात्र आपल्याला याबाबत वृत्तपत्रातून माहिती मिळाली. लोकसभा निवडणूक लढवणार मात्र ती वरिष्ठांचा आदेश असेल तर अशी भूमिका राणीताई लंके यांची असल्याचे आ.लंके यांनी यावेळी स्पष्ट केले. पत्रकारांनी धा चा मा करत चुकीचा अर्थ काढल्याचे त्यांचे म्हणणे होते. आपण लोकसभा निवडणूक लढवणार का यावर बोलताना आमदार लंके यांनी मी राष्ट्रवादी पक्षाचा लहान कार्यकर्ता आहे, पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काम करत असतो, मी पक्षाचा एक छोटा कार्यकर्ता आहे त्यामुळे वरिष्ठ जो निर्णय घेतील आणि आदेश देतील त्या पद्धतीने मी काम करणारा कार्यकर्ता आहे असे सांगितले. वरिष्ठांनी सांगितले तर मी कोणतीही निवडणूक लढवण्यास तयार असल्याचंही लंके यांनी माध्यमांना यावेळी स्पष्टपणे सांगत लंके दांपत्य मैदानात आहे हे स्पष्ट केले. एकंदरीतच लंके दांपत्य लोकसभा निवडणुकीच्या पूर्ण तयारीत असल्याचे दिसत असले तरी त्यांचे उमेदवारीचे उत्तर हे वरिष्ठांच्या आदेशात असून आता येणाऱ्या काही दिवसात लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवारी घोषित होत असताना नगर दक्षिणेमध्ये आमदार नीलेश लंके यांचे वरिष्ठ त्यांना काय आदेश देतात याची उत्सुकता सर्वसामान्यांबरोबरच महायुतीमधील इतर पक्षांनाही असेल अशी परिस्थिती दिसून येत आहे.

# ४१ जागांसाठी १०६ उमेदवारी अर्ज

## सैनिक बँक, ग्रामोद्योग संघ व राजे शिवाजी पतसंस्थेची निवडणूक

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका सैनिक सहकारी बँक, पारनेर तालुका खादी ग्रामोद्योग संघ व राजे शिवाजी ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या निवडणूकीसाठी एकूण ४१ जागांसाठी १०६ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.**

सैनिक बँकेच्या १७ जागांसाठी ६०, खादी ग्रामोद्योगच्या ११ जागांसाठी ३२ तर राजे शिवाजी पतसंस्थेच्या १३ १३ जागांसाठी १४ अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

विविध सहकारी संस्थांसाठी दाखल करण्यात आलेले उमेदवारी **अर्ज पुढीलप्रमाणे :**

**पारनेर तालुका सैनिक सहकारी बँक**

■ **सर्वसाधारण मतदार संघ**

सुकाळे शिवाजी बाबुराव, गंधाडे संतोष भिमाजी, मापारी संतोष तुकाराम, मापारी जससिंग सदाशिव, काळे नामदेव तुकाराम, तरटे संजय दत्तू, मते धर्माजी बहिरू, लंके मच्छिंद्र शांताराम, पठारे सुरेश राजाराम, पठारे दादाभाउ लक्ष्मण, रोहोकले सुभाष पंढरीनाथ, साठे भिमाजी केशव, नगरे वैभव विश्वनाथ, पोटघन कारभारी भाऊसाहेब, खोसे अशोक बाळासाहेब, मते योगेश अशोक, रेपाळे रावसाहेब किसन, पठारे सुरेश दगडू, थोरात लहू भागुजी, भुजबळ दत्तात्रेय बबन, करंजुले धोंडीभाउ किसन, रोहोकले अरूण पांडूरंग, वराळ विठ्ठल आनंदा, चेमटे नंदकुमार भाउसाहेब, पोटघन मारूती रभाजी, वराळ रावसाहेब आनंदा, नरसाळे बाळासाहेब हरिभाऊ, भुजबळ भाऊसाहेब गंगाराम, कारखिले रमेश सोन्याबापू, आंबुले दत्तात्रेय राणू, थोरात अनिल कारभू कळमकर विक्रम बबनराव, साठे विठ्ठल ईश्वर, करंजुले ताराचंद भाऊसाहेब, औटी विलास दादाभाऊ

■ **अनुसुचित जाती, जमाती मतदार संघ**

साळवी मधुकर सावळेराम, गायकवाड रमेश भैयाजी, रणदिवे आनंदा दादाभाऊ, साळवे देवदत्त कोंडाजी

■ **महिला प्रतिनिधी**

गायकवाड लिलावती प्रताप, भोगाडे अनिता भाऊसाहेब, तारडे मंगल राजेंद्र, कुलट शैला सोपान, भुजबळ आशाबाई भाउसाहेब

■ **इतर मागासवर्ग प्रतिनिधी**

नगरे वैभव विश्वनाथ, भुजबळ दत्तात्रेय बबन, व्यवहारे शिवाजी तुकाराम, भुजबळ भाउसाहेब गंगाराम, कळमकर विक्रमसिंह बबनराव

■ **विमुक्त जाती, भटक्या जमाती मागास प्रवर्ग**

हिलाळ बाळासाहेब बबनराव, इरकर संभाजी माणिक, गोस्वामी विनायक द्रोणागिरी

■ **तालुका कार्यक्षेत्र सोडून सर्वसाधारण प्रतिनिधी**

आक्षे संतोश शहाजी, गायकवाड दिपक जिजाबा, खेडकर हरिभाऊ पोपट, सोलेपाटील दत्तात्रेय नामदेव, जगताप राजेंद्र हनुमंतराव, तनपुरे नीलेश अंकुश, भोईटे अशोक श्रीरंग

**पारनेर तालुका खादी ग्रामोद्योग संघ**

■ **सर्वसाधारण मतदारसंघ**

सय्यद अन्सार अहमद, खैरे अण्णा भाऊसाहेब, खोडदे नीलेश खंडू, राजे हसन अमीर, भगत संजय भाऊसाहेब, करंदीकर राजेंद्र शंकर, जाधव अंबादास भाऊ, म्हस्के सतिश भाऊसाहेब, गाडगे सुनील अरूण, देशमुख अविनाश इंद्रभान, आबुज देविदास रामभाऊ, इनामदार शब्बीरभाई कमालभाई, कावरे बाळासाहेब पाटीलबा, कुकडे किरण बलभीम, जाधव अमित हरिभाउ, रासकर भाऊसाहेब रामभाऊ, चौरे श्रीकांत किसन, गायकवाड वैभव किसनराव, पठारे ईश्वर धर्माजी

■ **अनुसुचित जाती, जमाती मतदार संघ**

पठारे ईश्वर धर्माजी, जाधव अमित हरिभाऊ, लोहकरे संतोष सुरेश, करंदीकर राजेंद्र शंकर

■ **महिला राखीव**

ऐख रमीजा आयुब, देशमुख सारीका अविनाश, गोरे रेखा शरद, शेलार शोभा उत्तम उर्वरीत पान ३ वर

# कोरठण खंडोबाला पारंपारिक पद्धतीने मंत्रोच्चारात लागली हळद

■ माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंकेसह महिलांच्या हस्ते हळद विधी
■ पारंपरिक मांडव डहाळ्यांनी कार्यक्रमात आणली रंगत

पारनेर : प्रतिनिधी

प्रतिजेजुरी म्हणून नावलौकिक असलेल्या व जिल्ह्यासह राज्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठे येथील श्रीक्षेत्र कोरठण खंडोबाच्या पौष नवरात्राला प्रारंभ हळद लाऊन झाला.आज वेदमंत्राच्या जयघोषत देवाला हळद लागली.पौष पौर्णिमेला खंडोबाचे म्हाळसाबरोबर लग्न झाले अशी अख्यायिका आहे. माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके, देवस्थानच्या अध्यक्षा शालिनीताई घुले सरपंच सुरेखा वाळुंज,सुवर्णाताई धाडगे,सुरेखा पवार,सुरेखा चेडे, वैजंता मते,दिपाली औटी व आदी महिलांच्या उपस्थितत हळदी समारंभ पार पडला.



हळकुंड व पूजेचे साहित्याची मांडव डहाळ्यांसह पिंपळगाव रोठे गावातून महिलांनी वाजत गाजत मिरवणूक काढली.मंदिरात पारंपरिक पद्धतीने ओव्या,देवाची महिमा सांगणारी गाणी गात जात्यावर हळद दळण्यात आली.

त्यानंतर उपस्थित महिलांच्या हस्ते श्रीखंडोबाला हळद लावण्यात आल्यानंतर श्रीखंडोबाचे नवरात्र सुरू झाले.

यावेळी देवस्थानचे उपाध्यक्ष महेश शिरोळे,ज्येष्ठ विश्वस्त उर्वरीत पान ३ वर



## संपादकीय

# निवडकांची निकड




यंदाचे वर्ष हे निवडणुकांचे आहे. त्यामुळे केंद्र काय किंवा राज्य सरकारे काय, बहुतेक सगळे निर्णय मतपेट्या आणि मतपेढ्या यांच्याकडे लक्ष ठेवूनच होणार, यात शंका नाही. केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांच्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनाचा एकूण अर्थसंकल्पातला वाटा ही गेल्या तीन दशकांमध्ये क्रमाक्रमाने वाढत गेलेली चिंता आहे. यातूनच जी नवी पेन्शन योजना आली, तिच्यामुळे सरकारी तिजोरीवरचा भार कमी होणार होता. नव्या योजनेत सरकारनेच निवृत्ती वेतनाचा सारा बोजा उचलण्याऐवजी कर्मचाऱ्यांनी नोकरीत असताना केलेल्या बचतीवर आधारित सूत्र तयार करण्यात आले होते. यातून सरकारी पैसा वाचणार होता. मात्र, देशभरात अनुनयाची जी नवी रीत सुरू झाली आहे; तिच्यातूनच अनेक राज्यांनी जुन्या पेन्शन योजनेकडे निर्णय घेतला होता.महाराष्ट्र सरकारनेही त्या दिशेने पहिले महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. या निर्णयाचा दीर्घकालीन आर्थिक परिणाम होणार आहे. मात्र, सरकारी कर्मचारी हे संपाचा आणि आंदोलनांचा धाक दाखवू शकतात. तसेच, हा वर्ग बोलका असतो. त्याच्या नाराजीची भीती सगळ्यांच राज्यकर्त्यांना वाटत असते. लोककल्याणकारी राज्यात वृद्धावस्थेत सर्वांची काळजी सरकारने घेण्याची अपेक्षा चूक नसते. त्यामुळे, एकीकडे आयुर्मान झपाट्याने वाढत असताना आणि आरोग्यावरील खर्च हाताबाहेर जात असताना पूर्ण पेन्शन मिळण्यासाठी जुना पर्याय पुन्हा खुला व्हावा, ही कर्मचारी संघटनांची मागणी तत्त्वत: चूक नव्हती. राज्य सरकारच्या बाजूने पाहायचे तर एकच समाजघटक वृद्ध होत जाणार नाही. हातावर पोट असणारेही वृद्ध होतात आणि त्यांची तर काही व्याधी उपटल्यास ससेहोलपट होते. त्यांच्याकडेही सरकारनेच लक्ष द्यायचे असते. मात्र, निवडकांची निकड भागवणे आणि ती भागवण्यासाठी साऱ्या व्यवस्थेवर संघटितांचा दबाव येणे, हेच आजचे अपरिहार्य घटित आहे.
महाराष्ट्राआधी इतर राज्यांनीही जो जुन्या पेन्शनचा निर्णय घेतला, त्यामागेही हेच होते. आता महाराष्ट्र या रांगेत चालला आहे.राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकताच जो निर्णय घेतला आहे; त्याचा लाभ २५ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना होईल, असा अंदाज आहे. यात सरकारमान्य संस्थांमध्ये नोकरी करणारे आणि सरकारच्या तिजोरीतूनच वेतन मिळणारे शिक्षकही आहे. एक नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नेमणूक झालेल्या सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना आता आपल्याला नव्या निवृत्तिवेतन योजनेतच राहायचे आहे की जुन्या योजनेत परत जायचे आहे, याचा निर्णय सहा महिन्यांमध्ये घ्यायचा आहे. एकदा हा पर्याय आल्यानंतर शंभर टक्के कर्मचारी आणि अधिकारी जुन्या योजनेत परत जातील, यात शंका नाही. कारण त्यासाठीच तर आंदोलन चालू होते. तेव्हा आत्ता देण्यात आलेला पर्याय म्हणजे तांत्रिक बाबी पुऱ्या करणे आहे. २००५ नंतर नोकरीत आलेल्या कर्मचाऱ्यांनी नव्या निवृत्ती योजनेत सहभागी होण्यासाठी जे अंशदान केले होते; त्या रकमेची व्यवस्था काय करायची, हेही ठरवावे लागेल. राज्य सरकारने दोन्ही योजनांचा अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी तीन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची समिती नेमली होती, तेव्हाच एक पाऊल मागे घेतले होते. त्याची तार्किक परिणती नव्या निर्णयाने पुरी झाली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डिसेंबरमध्ये राज्य सरकार याबाबत सकारात्मक आहे, असे म्हटले होते. तेव्हा कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला होता. महाराष्ट्राच्या आधी राजस्थान, हिमाचल प्रदेश, छत्तीसगढ, पंजाब ही राज्ये आधीच जुन्या पेन्शनकडे गेली आहेत. या सर्व राज्यांच्या तिजोरीवरचा भार प्रचंड वाढला आहे. देशात केंद्रीय आणि राज्यांचे मिळून ८७ लाख निवृत्त कर्मचारी व अधिकारी आहेत. या साऱ्यांच्या पेन्शनचा तिजोरीवरचा वार्षिक भार काही वर्षांनी काही लाख कोटी रुपयांच्या घरात जाणार आहे. जुनी पेन्शन आणूनही राजस्थानात अशोक गेहलोत यांचे सरकार गेले आहे, याचाही धडा राज्यकर्ते शिकलेले दिसत नाहीत. राज्य सरकारच्या या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर संसदेत मात्र केंद्र सरकारने कोणत्याही परिस्थितीत जुन्या पेन्शन योजनेकडे परतणार नाही, असे नि:संदिग्ध शब्दांत सांगितले होते. असे सांगण्यासाठी जी दृढ राजकीय इच्छाशक्ती लागते; ती नसल्यानेही अनेकदा राज्याचे आर्थिक भवितव्य लक्षात न घेता असे निर्णय घेतले जातात. याच राज्य सरकारने गेल्या वर्षी हंगामी स्वरुपात कर्मचारी भरण्यासाठी नऊ संस्थांची नेमणूक केली होती. वाढत्या आर्थिक बोज्याची काळजी वाटून सरकारने उद्या मागल्या दाराने एकेक काम खासगी यंत्रणा किंवा संस्थांकडे सोपविण्यास सुरुवात केली तर समाजातील विषमता आणखी वाढेल की कमी होईल, याचा विचार करण्यासारखा आहे. एका बाजूला अंगणवाडी सेविका दर काही काळाने किमान सोयींसाठी सरकारचे दरवाजे ठोठावत राहतात आणि दुसरीकडे, संघटनेच्या ताकदीच्या जोरावर राज्य कर्मचाऱ्यांच्या संघटना हवा तो निर्णय सरकारला घ्यायला लावू शकतात, हे आजच्या आपल्या समाजव्यवस्थेचे चित्र आहे.

# युगनिर्मात्या आईसाहेब आणि प्रज्ञावंत सुपुत्र

**लोकनेता न्युज नेटवर्क**

एका महान मातेची आणि एका देदीप्यमान सुपुत्राची आज जयंती! युगनिर्मात्या आईसाहेब जिजाऊ आणि प्रज्ञावंत सुपुत्र स्वामी विवेकानंद या दोन्ही महान विभूतींना जयंती निमित्त शत शत नमन! हा अतिशय आनंददायी योग आज जुळून येतांना संपूर्ण भारतासाठी निश्चितच हा गौरवपूर्ण दिवस! सतराव्या शतकात जन्मलेल्या जिजाऊ आईसाहेब ह्या इतिहासातील सुवर्णपान आहेत तर त्यांच्या नंतर एकोणिसाव्या शतकात जन्मलेले स्वामी विवेकानंद हे तर्कशास्त्र-तत्वज्ञान याचं आढळ अधिष्ठान आहेत. एका मातेनं आपल्या शूरवीर विचारांनी रयतेचे राज्य स्थापन करतांना छत्रपती शिवाजी महाराजांसारखं नररत्न घडवलं तर स्वामीजींनी जगभर फिरून भारतीय मुलभूत तत्वज्ञानाची ओळख संपूर्ण जगाला करून दिली. आज एकाच दिवशी एका महान माता-सुपुत्रांचा गौरव ही आम्हा भारतीयांसाठी मोठी अभिमानाची गोष्ट!मातेच्या दैदिप्यमान कर्तृत्वाने आणि सुसंस्कारित पालन पोषणाच्या बळावर अनेकविध सुपुत्रांनी आकाशाला गवसणी घालण्याचे भव्य-दिव्य कार्य केल्याचा इतिहास सर्वसाक्षी आहे! छत्रपती शिवबांसारखे पुत्ररत्न घडवून आपल्या सर्वांगीण संस्काराने ज्या मातेने स्वबळावर रयतेचे साम्राज्य उभे केले अशा राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब यांचा इतिहास सुद्धा तेवढाच भव्य-दिव्य आहे! बालवयात वेरुळच्या भोसले घराण्यातील शहाजीराजे भोसले यांच्याशी त्यांचा विवाह झाला. संघर्ष जिजाऊंच्या पाचवीलाच पुजला होता. जाधव-भोसले यांच्यात बेबनाव झाला. दुर्दैवाने दोन्ही घरात प्रचंड वितुष्ट आले, परिणामी जिजाऊंचे माहेर कायमचे तुटले, परंतु न डगमगता त्यांनी शहाजीराजे भोसले यांचा संसार उजळवून टाकला. जिजाऊंसमोर अनंत अडचणींचे पहाड उभे होते. त्यातच शहाजी राजांना पुणे परगणा सोडून बंगळूरूला जावे लागले. जेष्ठ पुत्र संभाजींनी आपल्या वडिलांना भक्कम साथ दिली तर इकडे जिजाऊंनी शिवबांना मजबूत-तल्लख बनवले. मुघलशाही-कुतुबशाही-आदिलशाही-निजामशाही या बलाढ्य शाह्यांशी चार हात करण्याचे शारीरिक-मानसिक सामर्थ्य शिवबामध्ये निर्माण केले. काळ मोठा खडतर होता. गाढवांचा नांगर फिरलेल्या पुण्याच्या भूमीत अठरापगड जातीतील मावळ्यांच्या साथीने सोन्याचा नांगर फिरविण्याचे महत्कार्य आईसाहेबांनी केले! शूर-धाडसी-पराक्रमी मातेचे बाळकडू लाभलेल्या शिवबांनी





वयाच्या सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला काबीज करून स्वराज्याचे तोरण बांधले आणि नंतर मागे वळून पहिलेच नाही! एकावर एक आक्रमणे, शह-काटशहांनी जीवन व्यस्त-त्रस्त होत असतांना शिवबांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभे राहिल्या! युद्ध आणि व्यवहारकुशलतेने सूक्ष्म निरीक्षण-परीक्षण-मार्गदर्शन करण्याचे महत्वपूर्ण कार्य मांसाहेबांनी केले. विजापुर-मुघलसाम्राज्याशी संघर्ष, अफजलखान प्रकरण, पन्हाळगडचा वेढा, पावनखिंड लढाई, शाहिस्तेखान प्रकरण, सुरतची लुट, पुरंदरचा तह, आग्रा प्रकरण, मुघलांसोबत तह, उमराणी-नेसरीची लढाई आणि छत्रपती शिवबांचा राज्याभिषेक या सर्वच घटना सर्वसामान्यांचे डोळे दिपवून टाकणाऱ्या आहेत आणि या पाठीमागे खंबीर मार्गदर्शन कुणाचे असेल? तर ते मातोश्री जिजाऊंचे! जिजाऊंनी केवळ स्वराज्यच उभे केले नाही तर आपल्या मुलांमध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि संघर्ष करण्याची जिद्द निर्माण केली! छत्रपती शिवबांनी केलेले कार्य हे केवळ शक्तीचे कार्य नसून त्यामागे प्रचंड बुद्धिचातुर्य होते हे लक्षात घ्यावे लागेल. जात-धर्म-पंथ याचा संकुचित विचार कधी कुणाला शिवला नाही. सामान्यातील सामान्य आणि शिवबा समान मानून स्वराज्याची बांधणी माता जिजाऊंनी मोठ्या धीरोदत्तपणे केली आणि घराघरांत जाज्वल्य आत्मविश्वास पेरण्याचे महत्कार्य केले! याचाच परिणाम म्हणजे लोक स्वराज्यासाठी स्वतःचा जीव द्यायला तयार झाले! जीवा महाला, शिवा काशिदांसारख्या अनेकांनी हसत बलिदान दिले आणि त्यावर 'बहुजन हिताय' शिवबांनी आपल्या राजमुद्रेसह रयतेचे मराठी स्वराज्य संस्थापित केले!तसेच आज एक दैदिप्यमान व्यक्तिमत्व, तेजोमय ब्रह्मचर्य, अमोघ वाणी आणि ज्ञान-ध्यान-साधनेने ओतप्रोत लेखणीच्या सामर्थ्यावर जगाला आपली ओळख निर्माण करणारे नरेंद्र नाथ दत्त म्हणजेच स्वामी विवेकानंद जयंती म्हणजेच राष्ट्रीय युवक दिन! त्यांनी शिकागो जागतिक धर्मपरिषदेत बंधू-भगिनींनो शब्दांनी संपूर्ण जगाला भारताच्या वसुधैव कुटुंबकम तत्वाची ओळख करून दिली. जेमतेम ३९ वर्ष आयुष्य लाभलेले स्वामीजी म्हणजे ते चालते ज्ञानाचे बिंब।तयाचे अवयव ते सुखाचे कोंब! रामकृष्ण परमहंस यांच्या गुरुतत्व स्पर्शाने स्वामीजी अध्यात्मिक-वेदांत दर्शनाने ओतप्रोत व्यक्तिमत्व बनले! नैष्ठिक ब्रह्मचर्य, बलोपासना, ज्ञानसाधना, ध्यान धारणा, आत्मसन्मान, आत्मभान, आत्मविश्वास या सद्गुणांच्या बळावर मनुष्य आकाशाला गवसणी घालू शकतो हे सिद्ध केले. धार्मिक अवडंबर, ब्राह्मण्यवाद, पुरोहीतवाद, धर्माचे बीभत्स प्रदर्शन याला परखड विरोध करतांना ईश्वर मंदिरात नसून तो माणसामाणसात आहे ही वृत्ती म्हणजेच खरा हिंदू धर्म होय! असे स्वामीजी प्रतिपादन करत. स्वामीजींनी अजीवन युवकांना प्रेरित केले! उठा, जागे व्हा. स्वतः उठा आणि इतरांना उठवा. मनुष्यजन्म सुफळ करा आणि आपले ध्येय्य साध्य होईपर्यंत थांबू नका! हे स्वामीजींचे शब्द म्हणजे तरुणांपासून ते शंभर वर्षाच्या माणसाने जीवनात अंगिकारण्यासारखे आहेत! युवकांमध्ये नित्य स्फुल्लिंग चेतविण्याचे महत्कार्य स्वामीजींनी केले. बलदंड देहयष्टी, दैदिप्यमान-विद्वत्प्रचुर व्यक्तिमत्व, अंगावर भगवे वस्त्र, फेटा परिधान केलेले स्वामीजी म्हणजे दिव्यत्वाची प्रतीती! अल्पायुष्यात जगभर व्याख्याने, प्रचंड लेखन यातून अध्यात्म-विद्या और भारतीय दर्शन के बिना विश्व अनाथ हो जायेगा असे प्रतिपादन करून स्वामीजींनी भारताच्या ज्ञान समृद्धीला झळाळी दिली. स्वामी विवेकानंद केवळ संत नव्हते तर ते एक महान देशभक्त, विचारवंत, वक्ता, लेखक आणि मानवप्रेमी व्यक्तिमत्व होते! शिक्षण म्हणजे ज्यातून विद्यार्थी शारीरिक, मानसिक आणि आत्मिक विकसित झाला पाहिजे. शिक्षणातून चरित्र-चारित्र्य घडले पाहिजे. मन-बुद्धी विकसित होऊन विद्यार्थी आत्मनिर्भर बनला पाहिजे. आचरण-संस्कारसंपन्न शिक्षण गरजेचे आहे. शिक्षक-विद्यार्थी संबंध दृढ असावे. शिक्षक अत्यंत महत्वपूर्ण घटक असून तो आनंदी-सहिष्णू-प्रज्ञावंत-निर्व्यसनी असावा, त्याचा चुंबकीय प्रभाव आपल्या विद्यार्थ्यांवर नित्य राहील. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी तंत्रशिक्षण आवश्यक आहे. शिक्षणातून जीवनात संघर्ष करण्याची वृत्ती जोपासली जावी. असे मौलिक विचार स्वामीजींनी प्रतिपादन केले. संपूर्ण जीवन केवळ आणि केवळ देशोत्थानासाठी अर्पण केले. स्वामीजींचे जीवन सर्वांसाठी आदर्श, नित्य मार्गदर्शक आहे!आज एका मातेची आणि सुपुत्राची जयंती साजरी करतांना केवळ पुष्पहार घालून, वंदन करून चालणार नाही. आजही काळ तेव्हढाच खडतर आहे! नवनवी आव्हाने आपल्यासमोर आ वासून उभी आहेत. पैशापायी माणूस आपले सर्वस्व हरवून बसला आहे. आज शांत झोप लागत नाही! मोबाईल नावाच्या राक्षसाने घरदार गिळंकृत केलेय! गर्दीत सुद्धा माणूस वेड्यासारखा त्या डबड्यासोबत खेळतोय! एकटाच हसतोय! सगळीकडे वेडेच वेडे! हे चित्र महाभयंकर आहे! तेंव्हा आपल्या आदर्शांच्या जयंतीदिनी आपल्याला काहीतरी संकल्प करावे लागतील. मोबाईलपासून दूर राहून घराघरांत ग्रंथ वाचन करावे लागेल. सकाळ-सायंकाळ मोबाईल बंद ठेवून विश्वशांतीसाठी प्रार्थना म्हणावी लागेल! निरोगी-आनंदी जीवनासाठी सर्वांनाच व्यायाम-योगा-प्राणायाम-ध्यान करावेच लागेल! मोबाईल ऐवजी मैदानावर खेळ खेळावे लागतील. मूल्य शिक्षण घराघरांत रुजवावे लागेल. माणसामाणसात सुसंवाद वाढवावा लागेल. असे झाल्यास घराघरांत जिजाऊ आणि त्यानंतर शिवराय आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारखे सुपुत्र जन्माला येतील, अन्यथा आणखी एक जयंतीचा इव्हेंट, बस्स!

# पर्यटनाच्या नकाशावर 'बंगस', 'कालारूस'

दोनएक वर्षांपूर्वी चुरनाड, 'बंगस व्हॅली', वुलर लेक, कालारूस किंवा किला-ए-रुस, गुरेझ, लोलाब म्हटले, की ही ठिकाणे आहेत तरी कुठे... असा प्रश्न पडण्याइतपत परिस्थिती होती. हिरव्यागार कुरणांत चरणारे हजारो मेंढ्यांचे कळप, दरीतून वाहणारे स्वच्छसुंदर ओहोळ-नाले, कोवळ्या गवतावर चमकणारे दवबिंदू, पहाडांवर दाटून आलेले ढग, लाकडी खोपटांतून दरवळणारा कहाव्याचा गंध अशी 'बंगस व्हॅली' समाजमाध्यमांमध्ये झळकू लागली. उत्तर काश्मीरमधल्या दाल लेकहूनही मोठे वुलर लेक हे स्वच्छ सुंदर तळे आणि पुरातत्त्व अभ्यासकांना खुणावणारी किला-ए-रुस ही ठिकाणे अचानकच चर्चेत आली. बॉर्डर टुरिझमला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने उचललेल्या अनेक पावलांपैकी एक म्हणजे स्थानिकांना या पर्यटनाचे फायदे मिळवून देणे. त्यातूनच उत्तर काश्मीरमधली ही ठिकाणे पर्यटनाच्या नकाशावर आली. विशेष म्हणजे, स्थानिक काश्मिरी युवकांनी या संकल्पनेला उचलून धरले आहे.केंद्रशासित प्रदेश झाल्यावर काश्मीर कात टाकू लागले. प्रचलित ठिकाणांसह इतर संभाव्य पर्यटनस्थळांचा विचार होऊ लागला. पर्यटकांचा ओघ तिकडे कसा वळविता येईल, या विचारातूनच बॉर्डर टुरिझम या संकल्पनेला चालना देण्याचे प्रयत्न झाले. दोन वर्षांपूर्वी पर्यटन मंत्रालय आणि जम्मू-काश्मीर सरकारच्या प्रयत्नांतून 'बंगस फेस्टिव्हल'चे आयोजन केले गेले. तिथून खऱ्या अर्थाने बंगस व्हॅलीला समाजमाध्यमांमध्ये प्रसिद्धी मिळाली. या व्हॅलीचे बोड बंगस (मोठी बंगस) आणि लाकूत बंगस (लहान बंगस) असे दोन भाग पडतात. समुद्रसपाटीपासून दहा हजार फूट उंचीवरील ही व्हॅली म्हणजे निसर्गरंगांचा अद्भुत कलाविष्कार. मार्च २०२३ मध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काश्मीर आणि पाकव्याप्त काश्मीर यांच्या सीमेवरील शारदा यात्रा मंदिराचे उद्घाटन केले. त्यानंतर केरन, तिथवाल, कर्नाल, साधना टॉप, गुरेझ व्हॅली या ठिकाणांची चर्चा सुरू झाली. तिथली छायाचित्रे, रील्स मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली आणि गुलमर्ग, सोनमर्ग अन् पहलगाम या पलीकडेही काश्मीरमध्ये पाहण्यासारखे खूप काही असल्याची जाणीव पर्यटकांमध्ये रुजवली जावू लागली. या सगळ्यांत अर्थातच स्थानिकांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या. आज तिथवालसारख्या गावात लोक किशनगंगा नदी, शारदापीठ या ठिकाणांसाठी जात असले आणि धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने त्याकडे पाहिले जात असले, तरी या गावातले पन्नास होम-स्टे हे मुस्लिम बांधवांच्या घरचे आहेत, हे विसरून चालणार नाही. गाडी व्यवस्थेपासून ते राहण्यापर्यंत आणि चहा-नाश्त्यापासून येणाऱ्यांच्या सुरक्षेपर्यंत प्रत्येक गोष्टीची जबाबदारी ही मंडळी घेत आहेत.यंदा सलग दुसऱ्या वर्षी बंगस फेस्टिव्हल झाला आणि त्याला स्थानिकांसह पर्यटकांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हांडवाड्यापासून हाकेच्या अंतरावरील चुरनाडसारख्या नीरव शांतता जपणाऱ्या ठिकाणी पर्यटक स्थानिकांच्या भरवशावर जाऊ लागला. तीच गोष्ट कालारूस किंवा किला-ए-रूस या पुरातत्त्वीय वारसा जपणाऱ्या गुहावजा ठिकाणाची. पुरातन व्यापारी मार्गावरील हा रुसला अर्थात रशियाला जाण्याचा पुरातन मार्ग असल्याची आख्यायिका स्थानिकांमध्ये प्रचलित आहे. या ठिकाणाला स्थानिकांपेक्षा विदेशी पर्यटक जास्त भेट देतात, ते त्याच्या नावातील आकर्षणामुळे. या ठिकाणाला पर्यटनाच्या नकाशावर स्थान मिळाले असले, तरी त्याचा आणि एकूणातच या परिसराचा आणखी अभ्यास होणे गरजेचे आहे. उत्तर काश्मीरमधल्याच प्रसिद्ध हांदवाडापासून कुपवाडामार्गे अवघ्या तीस किलोमीटर अंतरावरील याच नावाच्या गावामागील पहाडावर ही गुहा आहे. या ठिकाणाला आवर्जून भेट द्यायला हवी. गुरेझ आणि लोलाब व्हॅलीही आता पर्यटनाच्या नकाशावर आली आहे. या ठिकाणची स्थानिक मंडळी अतिशय अतिथ्यशील आणि आपुलकी जपणारी आहेत. 'काश्मीरबद्दल असणारी साशंकता पर्यटकांना नेहमीच्या पॅकेज टुरिझमपलीकडे जाऊ देत नाही. मात्र, काश्मीरमधली इतर गावे आणि माणसेही सर्वांच्या स्वागतासाठी आपुलकीने सज्ज आहेत. बाइक रायडर्स किंवा ग्रुपने येणारे युवा काश्मीरमध्ये होम-स्टेना पसंती देत आहेत. यातून विश्वास, संवाद वाढतो आहे. काश्मिरी युवकांनाही प्रगती हवी आहे आणि आपल्या देशाशी हक्काने जोडले जाणेही,' अशी भावना येथील स्थानिक मुदस्सीर आणि सज्जाद या युवकांनी व्यक्त केली.केंद्र सरकारने कलम ३७० रद्द केल्यानंतर काश्मीरमध्ये नेमके काय बदलले? असा प्रश्न वारंवार विचारला जातो. याचे ठोस उत्तर आज नव्याने चमकणारा लाल चौक असो, तिथल्या क्लॉक टॉवरवर फडकणारा तिरंगा असो, दल लेकच्या बाजूला वेगाने सुरू असणारी विकासकामे असोत, पुन्हा एकदा काश्मिरी-पंडितांच्या यात्रा-सणवार साजरे होण्यात मिळत असले, तरी चकमकी आणि सामान्यांचे 'किलिंग्ज' थांबलेले नाहीत, याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. काश्मीरची जखम चिघळत राहावी, यासाठी बॉर्डरपलीकडून आणि स्थानिक फुटीरतावाद्यांकडून आजही या घटना घडविल्या जात असल्या, तरी सर्वांत मोठा बदल असा, की काश्मिरी पर्यटनाचा टक्का वर्षागणिक वाढतो आहे. जिथे एप्रिल-मेपासून ऑक्टोबरपर्यंत 'टुरिझम सीझन' बहरायचा तिथे आता ऐन स्नो-फॉलच्या दिवसांतही अगदी नोव्हेंबर ते मार्चपर्यंत पर्यटकांचा ओघ वाढला आहे आणि खऱ्या अर्थाने काश्मीर वर्षाचे दोन-तीन महिने वगळता पर्यटकांच्या 'मेहमानवाझी'त आपला राबता जपू लागल्याचे चित्र आहे. स्थानिक युवकांना रोजगार, त्याच्या संधी, सुखासिन आणि शांत जगणे हवे आहे. व्हॅलीतलला अमन-चैन त्यांना भविष्यासाठी महत्त्वाचा वाटतोय, हे त्यांच्या बोलण्यातून जाणवते, दिसते आणि व्यक्तही होते, आता गरज आहे त्यांच्या अपेक्षांना पुन्हा एकदा काटेरी कुंपणांबाहेर मुक्त विहरू देण्याची.उत्तर काश्मीरमधील अनेक ठिकाणे पर्यटकांच्या वावरापासून दूर आहेत. निसर्गरम्य असण्यासह तिथली शांतता आणि स्वच्छता ही या ठिकाणांची वैशिष्ट्ये आहेत. मात्र, थोडक्या पर्यटनानेही अनेक ठिकाणी प्लास्टिक प्रदूषण दिसू लागले आहेत. बंगस फेस्टिव्हल झाल्यावरही तिथे प्लास्टिकची पावले उमटू लागली. या पार्श्वभूमीवर सरकारने पर्यटनाबाबत आता कडक धोरणे अवलंबण्याची गरज असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

# जुगाडपंथाची नवी जादू

फेरीवाल्यांच्या अतिक्रमणावर उतारा म्हणून मुंबईत भूमिगत बाजार बांधण्यात येणार आहे. मुंबईकरांच्या डोळ्यांत धूळफेक करण्याची ही नवी आयडिया आहे. यापूर्वी मुंबईकरांनी अशी बरीच मूर्खांची नंदनवने अनुभवली आहेत.मुंबईत जागोजागी होणाऱ्या अतिक्रमणांमुळे आता राजधानी दिल्लीच्या धर्तीवर धरतीखाली भूमिगत बाजार बांधण्याची कल्पना म्हणजे लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करण्याची नवी 'आयडिया' आहे. यापूर्वी मुंबईकरांनी अशी बरीच 'मूर्खांची नंदनवने' अनुभवली आहेत. यातले एक म्हणजे रस्त्यांवर प्रचंड गर्दी आणि फेरीवाले असल्याने रस्त्यांच्या डोक्यावर बांधलेले स्काय वॉक. या सगळ्या आकाशमार्गांची स्थिती काय आहे, हे एकदा पाहायला हवे. यातले काही तर नंतर भंगाराच्या भावात विकावे लागले.आधीच प्रचंड धावपळ करणारे मुंबईकर ५०-५० पायऱ्या चढून हे मार्ग वापरतील का, इतकी साधी शंका तेव्हा हे जुगाड करणाऱ्यांना आली नाही. नंतर मुंबईत नागरिकांच्या सोयीसाठी बहुमजली पार्किंग इमारती बांधण्यात आल्या. असे वर जाऊन कोणी गाड्या लावते का? पावसाळ्यात जागोजागी पाणीउपसा पंप बसविणे किंवा प्रचंड मोठे भूमिगत तलाव बांधणे या कल्पना



आज यशस्वी झाल्यासारख्या वाटत असल्या, तरी ती नगर नियोजनाची खरी उत्तरे नाहीत. दिल्लीच्या भूमिगत पालिका बाजारात केवळ ३८० दुकाने आहेत. मुंबईतल्या आजच्या फेरीवाल्यांची संख्या दीड लाखापेक्षा जास्त आहे. या सगळ्यांना सामावून घेण्यासाठी संपूर्ण मुंबईच्या खाली बाजारपेठ बांधावी लागेल. मुंबईचे दिवंगत माजी आयुक्त शरद काळे 'मुंबईत वरच्यापेक्षा खाली जास्त गर्दी आहे,' असे म्हणत. सगळ्या सेवांच्या भूमिगत जाळ्यांविषयी ते हे सांगत असत. त्यानंतर आता मुंबईत भूमिगत मेट्रोही होते आहे. मुंबई आणि दिल्ली यांचे भूगोल पूर्ण भिन्न आहेत. हवामान वेगळे आहे. पाऊसमानात फरक आहे आणि वर्तनशैलीही भिन्न आहे. पर्यटकांना आकर्षण म्हणून एखादी भूमिगत बाजारपेठ बांधणे वेगळे आणि फेरीवाल्यांच्या प्रश्नावरचे 'हे घ्या उत्तर...' अशा थाटात भूमिगत बाजाराची संकल्पना मांडणे वेगळे.पावसाळ्यात साध्या रस्त्यांवरचे आणि रेल्वेच्या रुळांवरचे पाणी यंत्रणांना आटोपत नाही. नागरिकांसाठी केलेल्या रस्त्यांखालच्या सबवेंमध्ये मोकळी हवा खेळवता येत नाही. शंभर मीटर चालेपर्यंत लोक गुदमरण्याची वेळ येते. रेल्वेच्या जिन्यांवर माणसे केवळ गर्दी होऊन चेंगराचेंगरीत मरण पावतात. ज्या पालिका, नोकरशाही आणि सरकारला हे जिथे सांभाळता येत नाही, तिथे भूमिगत बाजारांचे फुगे कशासाठी सोडले जातात? एखादी संस्था, कंपनी साग्रसंगीत अहवाल बनवून सरकारच्या पुढ्यात काहीतरी कल्पना मांडते, ती इतरही हितसंबंधियांच्या सोयीचीच असते. मग स्वीकारा ती आणि बांधा करदात्यांच्या पदरात धोंडे, असे तर हे नाही ना?=

## शॉर्ट न्यूज

### नेवासा -संगमनेर रस्ता तातडीने दुरुस्त करा

**श्रीरामपूर :** नगरपरिषद हद्दीत असलेला नेवासा-संगमनेर रस्ता तातडीने दुरुस्त करण्याची सूचना आमदार लहू कानडे यांनी मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना केली आहे. श्रीरामपूर येथील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार कानडे यांची भेट घेऊन रस्त्याच्या दुरावस्थेबाबत निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात म्हटले आहे कि, आपल्या प्रयत्नातून श्रीरामपूर शहराला जोडणारे बेलापूर, श्रीरामपूर, नेवासा श्रीरामपूर, खंडाळा-श्रीरामपूर, गोंधवणी-श्रीरामपूर या रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले आहे.

### कोयता घेऊन फिरणाऱ्या तिघांना अटक

**सावेडी :** उपनगरात कोयता घेऊन फिरणाऱ्या गँगला तोफखाना पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने ताब्यात घेत अटक केली आहे. त्यांच्याकडून दोन कोयते व दुचाकी असा २५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पोलीस ठाण्यात आर्म ॲक्ट कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल गोपीनाथ गायकवाड, रोहीत रमेश औटे, विकास सदाशिव दिवटे अशी गँगमधील पकडलेल्या तिघांची नावे आहेत.

### विसापूर कारागृहात आरोग्य शिबिर

**श्रीगोंदा :** तालुक्यातील विसापूर कारागृहात शनिवारी बंदीवान, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर आयोजित केले होते. शिबिराचे आयोजन धर्मदाय उपायुक्त ज्योती पाटील यांच्या सहकार्याने व प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या वतीने केले होते. कारागृहाचे अधीक्षक प्रदीप जगताप यांनी सर्वांचे स्वागत केले. शिबिरात नाक, कान, घसा विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, त्वचा विकार, दंत विकार याबाबत आरोग्य तपासणी केली. यावेळी कारागृहातील एकूण १७० बंद्यांची, अधिकारी, कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करून औषधोपचार केले.

### महात्मा गांधींच्या भजनांनी परिसर भक्तीमय

**संगमनेर :** येथे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जन्मशताब्दी निमित्त राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे विचार सांगणारा बापू तेरे रास्ते या भावगीतांच्या कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात आली. वैष्णव जनते, कानडा राजा पंढरीचा, मोगरा फुलला, मिले सुर मेरा तुम्हारा, अशा गीतांमधून परिसर भक्तीरसात न्हावून निघाला. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कारखाना प्रेरणास्थळ येथे स्वातंत्र्यसेनानी भाऊसाहेब थोरात यांच्या जयंतीनिमित्त बापू तेरे रास्ते हा भजनांचा कार्यक्रम संपन्न झाला. प्रसंगी आ. बाळासाहेब थोरात उपस्थित होते.

### बेलपिंपळगावच्या उपसरपंचपदी कांगुणे

**नेवासा :** तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सुनीता वसंत कांगुणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मासिक मिटिंग ग्रामपंचायत सरपंच कृष्णा शिंदे यांच्या अध्यक्ष ते खाली पार पडली. ग्रामपंचायत सदस्य सुनीता कांगुणे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उप सरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आल्याचे ग्रामसेवक कृष्णा बडे यांनी सांगितले. यावेळी मावळते उपसरपंच गणेश कोकणे व नूतन उपसरपंच यांचा ग्रामपंचायत वतीने सत्कार करण्यात आला.

# आयोध्या आणि कर्डे गावात एकाच दिवशी श्री राम मंदिर लोकार्पण सोहळा!

**■ कर्डे गावच्या धार्मिक योगायोगाची तालुक्यात चर्चा**
**■ लोकवर्गणीतून उभे राहीले १ कोटीचे श्री राम मंदिर**

**शिरुर : सतीश डोंगरे**



**अयोध्या येथे २२ जानेवारीला श्रीराम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. तशीच तयारी शिरूर तालुक्यातील कर्डे येथील श्रीराम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याची ही सुरू आहे. ज्या दिवशी अयोध्येत श्रीराम मंदिराचे लोकार्पण होणार आहेत त्याच दिवशी कर्डे गावात श्रीराम मंदिराचाही लोकार्पण सोहळा पार पडणार आहे. विशेष म्हणजे आयोध्येत ज्या दिवशी श्रीराम मंदिराचे भूमिपूजन झाले त्याच दिवशी कर्डे गावातीलही श्रीराम मंदिराचे भूमिपूजन झाले आहे. कर्डे ग्रामस्थांनी साधलेल्या या धार्मिक योगायोगाची तालुक्यात सध्या जोरदार चर्चा सुरू आहे.**

श्रीराम, लक्ष्मण, सितामाता, हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण समारंभ या कार्यक्रमानिमित्त ३ दिवस भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन कर्डे ग्रामस्थांनी केले आहे.

शनिवार दि. २० जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजता प्रधान संकल्प, गणपती पूजा, पुण्यवचन, वसुंधरा पूजा, मूर्ती जलाभिषेक मुखदेवता पूजा दुपारी ३ ते सायं. ६ वाजता श्री मुर्तीची ग्रामप्रदक्षिणा रात्री ९ ते ११ ह.भ.प.अशोक महाराज जाधव (आकुर्डी) यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.

रविवार दि. २१ जानेवारी रोजी सकाळी ८ ते सायं. ५ वाजता अग्निस्थापन, नवग्रहदेवतापूजन, होमहवन विधी, देवांच्या मुर्तीना अभिषेक रात्री ९ ते ११ भागवताचार्य ह.भ.प. महेंद्र महाराज नलावडे (आळंदी) यांच्या हरी कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.सोमवार दि. २२ जानेवारी रोजी सकाळी १० : ०४ मि. देवांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा सकाळी ११:३९ मि. कलशारोहन समारंभ हस्ते एच.बी. पी. माधव महाराज इंगोले (आळंदी) दुपारी १२ ते २ वा.हरि कीर्तन ह.भ.प. उत्तम महाराज बढे (आळंदी) दुपारी २ वा. नंतर महाप्रसाद समस्त ग्रामस्थ करडे, लंघेवाडी, चव्हाणवाडी यांच्यावतीने महाप्रसाद कार्यक्रम संपन्न होणार आहे.

**आज कर्डे गावात जे भव्य असे श्रीराम मंदिर उभे राहात आहे त्या जागी मोडकळीस आलेले जुने श्री राम मंदिर होते. इंग्रज राजवटीत शहीद खेमाजी जगदाळे (सुभेदार) यांचे स्मरणार्थ सरूबाई भ्रतार खेमाजी जगदाळे यांनी व गांवकरी मिळून शके १८४३ साली या मंदिराची उभारणी केली होती. मंदिरासाठीची जागासुद्धा जगदाळे परिवाराने दान केलेली होती.सुभेदार खेमाजी जगदाळे हे लंघेवाडीचे माजी उपसरपंच वैभव जगदाळे यांचे खापर पंजोबा होत. या पूर्वीच्या मंदिराचा इंग्रज राजवटीत किरकोळ जिर्णोद्धार झालेला होता.त्यानंतर मंदिर मोडकळीस आले होते. ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून एकजुटीने हे भव्यदिव्य मंदिर उभे केले.**

मंदिरासाठी एकूण एक कोटी रूपयांपर्यंत खर्च झाला असून आमदार अशोकबापू पवार यांनी त्यांच्या आमदार निधीतून १५ लाख रूपये दिले आहेत बाकी सर्व रक्कम लोकवर्गणीतून उभी करण्यात आली आहे.मंदिरासाठी पाया भरणीपासून ते काम पूर्ण होईपर्यंतची सर्व जबाबदारी मंदिर समितीचे अध्यक्ष संतोष घायतडक , भाऊसाहेब पळसकर व सचिव शिवाजी शिंदे यांनी पार पाडली.

# शिरूर तालुका मराठी पत्रकार संघ वसंतराव काणे आदर्श पुरस्काराने सन्मानित

**पत्रकारितेसह सामाजिक कार्याची दखल**

**शिरूर : प्रतिनिधी**



**पत्रकारीतेबरोबरचं सामाजिक कार्यात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिरूर (जि. पुणे ) तालुका मराठी पत्रकार संघाला पुणे विभागीय पातळीवर ज्येष्ठ पत्रकार वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

मराठी पत्रकार परिषद मुंबई यांच्या वतीने नांदेड जिल्ह्यातील तिर्थ क्षेत्र माहूर (ता. किनवट ) येथे पत्रकार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी महाराष्ट्र राज्यात पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दोन जिल्हा पत्रकार संघांना रंगाअण्णा वैद्य व आठ तालुका पत्रकार संघांना वसंतराव काणे आदर्श पत्रकार पुरस्काराने गौरविण्यात आले.पुणे विभागातून आदर्श तालुका पत्रकार संघ म्हणून शिरूर तालुका मराठी पत्रकार संघास जेष्ठ पत्रकार वसंतराव काणे आदर्श पत्रकार संघ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्षम तालुका अध्यक्ष संजय बारहाते यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.या वेळी ज्येष्ठ पत्रकार नितीन बारवकर यांच्यासह तालुक्यातील सदस्य यांनी पुरस्कार स्विकारला.

कोरोना काळात किराणा वाटप, वृक्षारोपण, आरोग्य शिबीर, यांच बरोबर व अनेक उपक्रम संघाने राबविले. पत्रकार संघाच्या याच कार्याची दखल राज्य स्तरावर पत्रकार परिषदेने घेऊन शिरूर तालुका मराठी पत्रकार संघाला राज्यस्तरीय वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


पुरस्कार शिरूर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक नितीन बारवकर , तालुका अध्यक्ष संजय बारहाते, समन्वयक पोपटराव पाचंगे,सतिष धुमाळ,धनंजय तोडकर ,नवनाथ रणपिसे,युन्नुस तांबोळी,सिकंदर तांबोळी ,धर्मा मैंड,शरद राजगुरू,महादेव साकोरे, गणेश थोरात ,मारुती पळसकर अमिन मुलाणी, यांनी पुरस्कार स्विकारला.

यावेळी किनवट माहूरचे आमदार भिमराव केराम,भाजपाचे समन्वयक व स्वागताध्यक्ष रामदास सुमठाणकर ,मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख,राष्ट्रीय अध्यक्ष शरद पाबळे,विश्वस्त किरण नाईक, मिलींद अष्टेकर, विजय जोशी, पुणे जिल्हाध्यक्ष सुनिल लोणकर ,सी एन न्युज च्या ब्युरो चिफ विजया देशपांडे,नांदेड जिल्हा अध्यक्ष गोवर्धन बियाणी,माहूर तालुका अध्यक्ष सर्फराज दुसाणी ,आदी मान्यवरांसह महाराष्ट्रातील कानाकोपर्यातून आलेले पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्या बद्दल राज्याचे सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील खासदार डॉ अमोल कोल्हे ,आमदार अशोक पवार, माजी आमदार पोपटराव गावडे ,शिरूर आंबेगाव राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष मानसिंगभैय्या पाचुंदकर यांनी पत्रकारांचे अभिनंदन केले .

# शिवसेनेचे अध्यक्ष होण्याची तुमची लायकी आहे का?

**उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री शिंदेंना धरले धारेवर**

**मुंबई : प्रतिनिधी**



**शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची महापत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेतून कायदेतज्ज्ञांनी नार्वेकरांचा निकाल कसा चुकीचा आहे, हे मांडण्यात आले. ॲड. असीम सरोदे, ॲड. रोहित शर्मा यांनी कायद्याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी संबोधित केले.**

यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, मी जर शिवसेनेचा कोणीच नव्हतो. तर २०१४,२०१९ ला तुम्ही माझ्याकडे का आलात, अमित शहा मातोश्रीवर काय म्हणून आले होते. मिंध्यांची नियुक्ती कोणी केली, असा सवाल केला. शिवसेना पक्षाचे अध्यक्ष होण्याची तुमची लायकी आहे का? असा सवाल करत ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. तर राहुल नार्वेकर यांच्यावर देखील हल्लाबोल केला. नार्वेकरांची हिंमत असेल तर पोलिस संरक्षण न घेता त्यांनी लोकांमध्ये याव अन सांगावे की खरी शिवसेना कुणाची आहे. मग लोक ठरवतील खरी शिवसेना कोणाची आहे.

**सर्व नेत्यांची होती उपस्थिती**

या पत्रकार परिषदेला ठाकरे गटाचे सर्व नेते, पदाधिकारी मोठ्या संख्येने या पत्रकार परिषदेला हजर होते.संपूर्ण ठाकरे कुटुंबातील रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे यांच्यासह खासदार संजय राऊत, सुभाष देसाई, अनिल देसाई, अनिल परब आदी नेत्यांची या ठिकाणी उपस्थिती होती.

# कर्जतमध्ये भाजपाची तालुका कार्यकारिणी जाहीर

**ज्येष्ठांसह निष्ठावान नवतरुणांना स्थान**

**कर्जत : प्रतिनिधी**

**कर्जतमध्ये भाजपाची तालुका कार्यकारिणी तालुकाध्यक्ष शेखर खरमरे यांनी जाहीर केली. यामध्ये जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीच्या गणानिहाय ८ उपाध्यक्ष, ७ चिटणीस, ३ सरचिटणीस याशिवाय इतर पदाची निवडी पत्रकार परिषद घेत जाहीर करण्यात आल्यात. तर विशेष निमंत्रित सदस्यांमध्ये तब्बल ६४ जेष्ठ आणि निष्ठावान नवतरुणांना स्थान देण्यात आले. या पत्रकार परिषदेस भाजपाचे जिल्हा सरचिटणीस सचिन पोटरे, किसान आघाडीचे सुनील यादव उपस्थित होते.**



कार्यकारिणीत निष्ठावान नवतरूणांना स्थान

कर्जत तालुका भाजपाची विविध पदांच्या कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष युवराज शेळके (कोरेगाव), रमेश अनारसे (अळसुंदे), सुरेश मोढळे (देशमुखवाडी), प्रकाश शिंदे (चापडगाव), संतोष निंबाळकर (पाटेवाडी), संभाजी बोरुडे (कोकणगाव), सुनील काळे (करपडी), समीर जगताप (कुळधरण), तालुका सरचिटणीस पप्पू धोदाड, राहुल निंबोरे, दत्तात्रय मुळे यांची तर चिटणीस म्हणून संतोष फरांडे, कल्याण नवले, सारंग घोडेस्वार, विष्णू गदादे, मंगेश थोरात, विठ्ठल अनभुले, प्रकाश पठारे यांची निवड करण्यात आली आहे.

महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी प्रतिभा रेणूकर, शहराध्यक्ष आशा वाघ, कर्जत तालुका सोशल मीडिया प्रमुख काकासाहेब पिसाळ तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून दीपक गावडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच भाजप युवा मोर्च्याचे अध्यक्षपदी निळकंठ शेळके, कर्जत शहराध्यक्ष गणेश क्षीरसागर, शिवाजी काळे (राशीन), संदीप बुद्धिवंत (मिरजगाव) तर ओबीसी कर्जत तालुकाध्यक्ष म्हणून अजित अनारसे यांना स्थान देण्यात आले. तर पांडुरंग क्षीरसागर (ओबीसी सरचिटणीस), नंदलाल काळदाते (वैद्यकीय आघाडी), भाऊसाहेब गावडे, प्रशांत शिंदे (भटक्या विमुक्त आघाडी), गणेश जंजिरे, उदयसिंग परदेशी (किसान आघाडी), प्रवीण लोंढे (अनुसूचित जाती-जमाती), सुनील पोकळे (सांस्कृतिक आघाडी), अनिल खराडे (कामगार आघाडी), सुहास गावडे (दिव्यांग सेल), फारूक पठाण (अल्पसंख्याक आघाडी) यांना या कार्यकारिणीत स्थान देण्यात आले.

# मराठ्यांच्या वादळाचा २३ जानेवारीला रांजणगाव मध्ये मुक्काम !

**■ जरांगेच्या समन्वय समितीची मुक्कामाच्या ठिकाणाची पाहणी ■ शिरुरमधील मराठा कार्यकर्त्यांची नियोजनाची जय्यत तयारी**

**शिरुर : सतीश डोंगरे**

**जालना जिल्ह्यातील आंतरवली सराटी येथून मराठा आरक्षणासाठी मुंबईकडे रवाना होत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण मोर्चाचे वादळ २३ जानेवारीला रांजणगांवला मुक्कामी थांबणार आहे. यावेळी याठिकाणी जाहीर सभेचे आयोजनही करण्यात आले आहे. त्यादृष्टीने स्थानिक कार्यकर्त्यांनी नियोजनाची जोरदार तयारी चालविली आहे.**



आंतरवली सराटीतून मनोज जरांगे पाटलांच्या नेतृत्वाखाली निघोलेली ही पायी दिंडी बीड जिल्ह्यानंतर नगर जिल्ह्यात पोहचणार आहे. तेथून शिरूर मार्गे रांजणगांवला मुक्कामाचे नियोजन करण्यात आले आहे. या मुक्कामाने तर ही पायी दिंडी मुंबईकडे कुच करणार आहे. जरांगे पाटील यांच्या समन्वय समितीच्या एका टीमने नुकतीच या ठिकाणाची पाहणी करून स्थानिक कार्यकर्त्यांशी चर्चा केली. रांजणगाव एमआयडीसीतील व्हर्लपूल कंपनी समोरील १०० एकर जागेवर या मोर्चेकरांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

आंदोलनकर्त्याची भोजनव्यवस्था, निवासव्यवस्था, पाणीव्यवस्था, चहा नाष्टा,व अन्य बाबी संदर्भातील नियोजना संदर्भात स्थानिक कार्यकर्त्यांची नुकतीच एक बैठक पार पडली. या बैठकीत शिरूर तालुका आणि शिरूर शहरातून घराघरातून आंदोलनकर्त्यांसाठी चपाती व शेंगदाणा चटणीचे संकलन करण्यात येणार आहे. त्याच बरोबर विविध गावातुन बुंदीचे ही संकलन करण्यात येणार आहे. यासाठी सर्वांनी प्रतिसाद द्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. त्याखेरीज शहर व तालुक्यातून फक्त रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात येणार आहे . पुणे नगर रस्त्यावर विविध ठिकाणी पिण्याचा पाण्याचे टँकर व फुड पॅकेटस, चहा यांचे वाटप करण्यसंदर्भात नियोजन करण्यात आले आहे .

# गायिका वैदेही मेंगदे यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार

**गायन क्षेत्रातील कार्याबद्दल गौरव**



**श्रीरामपूर : प्रतिनिधी**

**अल्पावधीतच गायन क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या श्रीरामपूर शहरातील गायिका वैदेही श्रीपाद मेंगदे यांना अहमदनगर येथील स्व. पै.किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था यांच्यावतीने राजमाता जिजाऊ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.**

श्रीरामपूर येथील गायिका वैदेही मेंगदे यांनी उत्तर नगर जिल्ह्यात सांस्कृतिक व इतर कार्यक्रमात आपल्या गायन कलेने रसिकांची वाहवा मिळवली आहे. मराठी, हिंदी चित्रपट गीते , भावगीते, भक्तिगीतांचा कार्यक्रम सादरीकरण त्यांच्या माध्यमातून सुरू असतो. त्यांच्या गायन क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा सप्ताह निमित्ताने नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील स्व. पै.किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला आहे. यावेळी राजेंद्र देसाई कवी आनंद साळवे, शेख सर, श्री.खैरनार दादादा, श्रीपाद मेंगदे आदी उपस्थित होते

(पान १ वरून)

### ४१ जागांसाठी १०६ उमेदवारी अर्ज

**■ इतर मागास वर्गीय**

बोरूडे ऋषीकेश जगन्नाथ, कुबडे किरण बलभीम, चौरे श्रीकांत किसन.

विमुक्त जाती, भटक्या जमाती

शेख आयुब पापाभाई, पांढरे राजू दत्तात्रेय

**■ राजे शिवाजी पतसंस्था**

**सर्वसाधारण प्रतिनिधी**

काकडे अलंकार अहिलाजी, ठुबे पांडूरंग तबाजी, बागले प्रशांत दिनकर, सोनावळे अण्णासाहेब माधवराव, ठुबे कानिफनाथ शिवाजी, ठुबे भास्कर नबाजी, ठुबे गोवर्धन अमृतराव, ठुबे राजेंद्र सिदु, खोसे मंगेश संपत,

**■ महिला प्रतिनिधी**

ठुबे सुलोचना अमृतराव, शेळके कमल लक्ष्मण

**■ इतर मागासवर्ग प्रतिनिधी**

गुमटकर बाबासाहेब पोपट

### कोरठण खंडोबाला पारंपारिक पद्धतीने मंत्रोच्चारात लागली हळद

पांडुरंग गायकवाड,तुकाराम जगताप,सचिव जालिंदर खोसे,सहसचिव कमलेश घुले, विश्वस्त राजेंद्र चौधरी, माजी सरपंच अशोक घुले,अजित महांडुळे रामदास मुळे धोंडीभाऊ जगताप दिलीप घुले,महादेव पुंडे चंद्रकांत ठुबे यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक, ग्रामस्थ उपस्थित होते.

# गुरूदेव प्रशालेच्या सहा विद्यार्थ्यांना सुवर्णपदके

## ओम येणारे लेव्हल दोन साठी पात्र



### हे आहेत यशस्वी विद्यार्थी

**मॅथ ऑलंपियाड**

ओम येणारे ५० /६० इंटरनॅशनल रँक ३३८, आयान शेख ४४/६० इंटरनॅशनल रँक १२१९, पुष्पक मगर ४३/६० इंटरनॅशनल रँक १३६४

**सायन्स ऑलंपियाड**

श्रध्दा ठोकळ २६/६० इंटरनॅशनल रँक १००५, ओम येणारे २५/६० इंटरनॅशनल रँक १०७२, पूर्वा गवळी २५/६० इंटरनॅशनल रँक १०५९

सुपा : प्रतिनिधी

**सुपा औद्योगिक वसाहतीनजीकच्या गुरूदेव प्रशालेच्या सहा विद्यार्थ्यांना एस ओ एफ नॅशनल सायन्स ऑलींपियाड स्पर्धेत सुवर्णपदके पटकाविली. ओम संजय येणारे या विद्यार्थ्याने ६० पैकी ५० गुण प्राप्त करून तो लेव्हल दोनसाठी पात्र झाला.**

जगभरातील ७० देशांतील ९१ हजार शाळांमधील विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाची ही परीक्षा दिली होती. त्या गुरूदेव प्रशालेतील इयत्ता नववीच्या सोळा विद्यार्थ्यांनी सायन्स ऑलंपियाड व मॅथ ऑलंपियाड या दोन परीक्षांमध्ये सहभाग नोंदविला होता. या परीक्षेत प्रशालेचे १०० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांचा नॅशनल, रिजनल व स्कुल लेव्हलचा निकाल नुकताचा प्राप्त झाला. भारतातील गुरगांव, हरियाणा येथे एस ओ एफ नॅशनल ओलंपियाड या संस्थेचे मुख्य कार्यालय असून या संस्थेमार्फत या परीक्षेचे आयोजन करण्यात येते.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे गुरूदेव प्रशालेने आंतरराष्ट्रीय पातळीवर दबदबा निर्माण केला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक सुभाष मगर, अध्यक्ष संतोष मगर, प्राचार्य अविनाश भिंगारदिवे यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना तुषार कदम, तुषार दाते, मुकुंद साठे यांनी गणित तर ऋतुजा महाजन, संतोष खराबी, भरत चौधरी यांनी शास्त्र विभागाचे मार्गदर्शन केले. परीक्षा प्रमुख म्हणून सोनाली देवकर यांनी नियोजन केले.

# ऑनलाईन गुन्हेगारीपासून सावध रहा

## संभाजीराव गायकवाड यांचे प्रतिपादन




सायबर सुरक्षा जागरूकता या विषयावर पारनेर महाविद्यालयात आयोजित कार्यशाळचे पोलीस निरीक्षक संभाजीराव गायकवाड यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

पारनेर : प्रतिनिधी

**इंटरनेटच्या सकारात्मक वापराबरोबरच अपप्रवृत्तीद्वारे केला जाणा-या दुरूपयोगामुळे सर्वसामान्यांचे जीवन डळमळीत होउ शकते. त्यामुळे अशा ऑनलाईन गुन्हेगारीपासून सावध रहण्याचा सल्ला पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजीराव गायकवाड यांनी दिला.**

पारनेर महाविद्यालयातील बीबीए-सीए विभाग, विद्यार्थी विकास मंडख व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा जागरूकता या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेचे उदघाटन गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लोक सेलफोनचे कैदी झाल्याचे नमुद करून यावेळी पुढे बोलताना गायकवाड यांनी सायबर गुन्हेगारीचे स्वरूप, त्याची व्याप्ती आणि आव्हाने याबाबत मार्गदर्शन केले.

प्रा. सोन्याबापू तळुले यांनी विद्यार्थ्यांना सायबर स्टॉकिंग, इंटरनेट वापरताना आपला आयडी क्रमांक, नेट बँकींग खातमे क्रमाक, पासवर्ड किंवा डेबिट पासवर्ड क्रमांक थवा आपली वैयक्तीक माहिती उघड करताना सावधानता बाळगण्याचा सल्ला दिला.

कार्यशाळेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनीही वेगवेगळया प्रकारचे सायबर अटॅक, व्हायरस स्कॅम, हॅकिंग याबाबत मार्गदर्शन केले. सायबर गुन्हयांपासून संरक्षण कसे करायचे यासबंधी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. तुकाराम थोपटे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. रविंद्र देशमुख, बी बी ए सी ए विभागाचे प्रमुख प्रा. रणजीत शिंदे, प्रा. प्रियंका आतकर, प्रा. फौजिया शेख, प्रा. पुजा शिंगोटे, प्रा. राजेश पिंपरकर, प्रा. अनिल भांगरे आदी प्राध्यापकांसह विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. ऐश्वर्या घोडके यांनी सुत्रसंचलन, डॉ. रविंद्र देशमुख यांनी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर डॉ. युवराज वाघेरे यांनी आभार मानले.

# संकटावर मात करून शंभूराजांनी हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले - प्राचार्य डॉ. शरद पारखे

## अळकुटी महाविद्यालयात संभाजीमहाराजांचा राज्याभिषेक दिन



अळकुटी : प्रतिनिधी

**छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्यावर परकियांबरोबरच स्वकियांच्या रूपानेही अनेक संकटे उभी ठाकलेली असताना सर्व संकटांवर मात करीत छत्रपती संभाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचे रक्षण केल्याचे प्रतिपादन अळकुटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पारखे यांनी केले.**

लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामिण शिक्षण संस्थेच्या अळकुटी महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांचा ३४३ वा राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. पारखे यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. पारखे म्हणाले, मध्ययुगात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या रूपाने हिंदवी स्वाभिमानाचे पुनःरूज्जीवर घडवून आणले व त्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांनी महाराष्ट्र धर्माचे रक्षण करीत स्वराज्याचा संसार अव्याहतपणे सांभाळला. एकूणच शंभूराजांचा राज्याभिषेक हे स्वराज्याचे सुवर्णपानच असल्याचे डॉ. पारखे यांनी सांगितले.

इतिहास विभागप्रमुख प्रा. अर्जुन चाटे यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेत राज्याभिषेक सोहळयाची महती पटवून दिली. आलेल्या संकटांवर मात करीत हिंदवी स्वराज्याचे रक्षण केल्यामुळेच आज संपूर्ण भारत देश हा छत्रपती संभाजी महाराजांना धर्मरक्षक तसेच सिंहाचा छावा म्हणून ओळखतो.

यावेळी डॉ. कुंदा कवडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. संजय जाधव, प्रा. शिर्मिष्ठा बोरूडे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. दत्तात्रेय शेळके, डॉ. शांताबाई थोरात, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. अमोल नालकर, प्रा. पुजा वैरागर, प्रा. सचिन बलसाने, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. ऋषीकेश गिते, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. मोहन माने, गोरख घोलप, सुर्यमाला भोर, विकास सोनवणे, राहुल बोरूडे, सागर शितोळे, मच्छिंद्र म्हस्कुले, रवींद्र वाघ, वैजनाथ आवारी, शिवाजी कळंबे, पांडूरंग शिरोळे आदी प्राध्यापक, प्राध्यपकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रा. विशाल रोकडे यांनी मानले.

# चोंभूत-अळकुटी रस्त्याची दुर्दशा

## स्थानिक ग्रामस्थांनी वेधले लोकप्रतिनिधींचे लक्ष

चोंभूत : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्याच्या पश्चिम भागातील अळकुटी-चोंभूत रस्त्याची अतिशय दयनिय अवस्था झाली असून हा संपूर्ण रस्ता उखडला गेला आहे. पावला गणिक खडडयांचे साम्राज्य निर्माण झाल्याने या रस्त्यावरून वाहने हकायची तरी कशी असा प्रश्न निर्माण झाला आहे.**



स्थानिक ग्रामस्थांनी रस्त्याच्या दुर्दशेसंदर्भात क्रियाशिल खासदार- आमदार असताना या रस्त्याची दुरावस्था का झाली असा सवाल केला आहे. पारनेर तालुक्याच्या पश्चिम भागातील आळेफाटा-पारनेर रस्त्यावर वसलेले अळकुटी हे गाव मुख्य व्यापारी केंद्र आहे. पाडळीआळे, कळस, गारखिंडी, रांधे, दरोडी, चोंभूत, म्हस्केवाडी, रेनवडी, शिरापूर आदी गावांचा संपर्क एकटया अळकुटी गावाशी येतो. दळणवळणाच्या दृष्टीने इतर गावांचे रस्ते बऱ्यापैकी आहेत. मात्र त्या तुलनेत चोंभूत-अळकुटी रस्त्याची परिस्थिती अतिशय बिकट आहे.

शैक्षणिक दृष्टया विचार केला तर या रस्त्यावरून बहुतांश विद्यार्थी-विद्यार्थीनी शाळा महाविद्यालयांत शिक्षण घेण्यासाठी दररोज येत असतात. रविवारी आठवडे बाजार असल्याने मोठया प्रमाणावरील वर्दळ याच रस्त्यावरून होते. निघोज परिसरातून आळेफाटयाकडे जाणारे विद्यार्थी अथवा इतर प्रवाशीही याच रस्त्याचा वापर करतात. हा रस्ता अत्यंत खराब झाल्याने वाहन चालक अक्षरशः मेताकुटीला येत असून या रस्त्याच्या तात्काळ दुरूस्तीची मागणी करण्यात येत आहे. खासदार-आमदारांनी या रस्त्याच्या दुरूस्तीकडे लक्ष घालून लवकरात लवकर या रस्त्याची दुर्दशा दुर करण्याची मागणी स्थानिक नागरीकांनी केली आहे.

# ज्ञानेश्वर कवडे सन्मान कर्तृत्वाचा पुरस्काराने सन्मानित

## शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल

निघोज : प्रतिनिधी

**निघोज येथील कला शिक्षक ज्ञानेश्वर कवडे यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यातील भरीव कामाची दखल घेऊन धुळे येथील महाराष्ट्र टीचर्स असोसिएशनच्या वतीने सन २०२४ चा सन्मान कर्तृत्वाचा या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.**




**आपण केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कामाचा सामाजात योग्य वेळी सन्मान होत असतो. धुळे येथील महारार्ष्ट टीचर्स असोसिएशनच्या वतीने देण्यात येणारा सन २०२४ चा पुरस्कार नक्कीच शैक्षणिक व सामाजिक कार्यात अधिक जोमाने काम करण्यासाठी प्रेरणा देईल.**

**प्रा. ज्ञानेश्वर कवडे**
**कला शिक्षक**

दैनिक सामनाचे संपादक तथा शिवसेना नेते खासदार संजय राउत, शिवसेना नेत्या शुभांगीताई भास्करराव पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या सोहळयात हा पुरस्कार कवडे यांना प्रदान करण्यात आला.

चित्रकलेबरोबरच निसर्ग पुरक इको फ्रेंडली गणेश मुर्ती, निसर्गरम्य आकाशकंदील, खडू रेखाटनामधून समाजप्रबोधन अशा विविध उपक्रमांची दखल घेउन कला शिक्षक प्रा. ज्ञानेश्वर कवडे यांना आतापर्यंत महाराष्ट्र राज्यात विविध पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलेले आहे.

याप्रसंगी खा. विनायक राउत, शिक्षण आयुक्त सुरज मांढरे, आमदार सुनील शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नगर जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, आमदार आमशा पाडवी, शिवसेना उपनेते सुनील बागुल, अद्वय हिरे, विद्याधन शिक्षण समुहाचे संचालक प्रा. भरत डोके, बालाजी उद्योग समुहाचे राजुभाउ लंके, कलाकार शहाबुददीन कादरी आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

# ४० वर्षानंतरच्या भेटीने सवंगडी आनंदले!

## फेटे बांधून, ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक



कर्जुले हर्या : प्रतिनिधी

**आणे येथील सरदार पटेल हायस्कुलमध्ये सन १९८३-८४ या शैक्षणिक वर्षात दहावीच्या वर्गात शिकलेले सवंगडी ४० वर्षानंतर एकमेकांना भेटल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता.**

मुंबईत शिक्षक असलेले भाऊसाहेब आहेर यांच्या संकल्पनेतून या वर्ग मित्र मैत्रिनींनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. गेट टुगेदर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात येऊन तारीख वेळही निश्चित करण्यात आली. अनेक वर्षानंतर होणाऱ्या भेटीची सर्वांनाच आस लागली होती. अखेर १४ जानेवारीचा दिवस उजाडला आणि सकाळीच सर्व माजी विद्यार्थी शाळेत एकत्र झाले. सर्वांना फेटे बांधून गावातून ढोल ताशांच्या गजरात मिरवणूकही काढण्यात आली.

या कार्यक्रमासाठी शिक्षक राम अवचट, भगवंत दांगडगव्हाळ, अनंथा आहेर तसेच शिक्षकेतर कर्मचारी ज्ञानेश्वर हे उपस्थित होते. मिरवणूक शाळेत पोहचल्यानंतर सरस्वती पुजन करण्यात आले. सरदार पटेल शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गित गायल्यानंतर हयात नसलेल्या वर्ग मित्र, मैत्रीणींना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

भाऊसाहेब आहेर यांनी या स्नेहमेळाव्याच्या आयोजनाबाबत प्रास्ताविकातून माहिती दिल्यानंतर शिक्षक राम अवचट, भगवंत दंडगव्हाळ यांनी चाळीस वर्षानंतर विविध क्षेत्रात यशस्वी झालेल्या आपल्या माजी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. माजी विद्यार्थ्यांनी गेल्या चाळीस वर्षातील सुख, दुःखाचे प्रसंग कथन करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. सिंधूबाई शिंदे, भगवान गोत्राळ गोपिचंद चौधरी यांनी सर्वाना भेटून खूप आनंद झाल्याच्या भावना व्यक्त केल्या. जयराम दाते, खंडू दाते, गेनभाऊ हांडे, मथू गाजरे यांनी दरवर्षी असेच भेटत जाऊ अशी सुचना केली.

हा स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी भाऊसाहेब आहेर, सुधीर आंबेकर, धोंडीभाऊ शिंदे, खंडू आहेर, निवृत्ती शिंदे, जयराम दाते, निवृत्ती आहेर, हनुमंत दाते, तुषार आहेर, बाबाजी शिंदे, मारूती आव्हाड, अलका आहेर यांन विशेष परिश्रम घेतले. निवृत्ती आहेर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# बांधकाम विभागाने नारायणगव्हाणकरांच्या तोंडाला पाने पुसली!

## ■ पंधरा दिवसांत बैठकीचे आश्वासन हवेत विरले ■ १ फेब्रुवारी चक्का जाम आंदोलनाची हाक

सुपा : प्रतिनिधी

**नारायणगव्हाणमधून जाणाऱ्या नगर पुणे महामार्गाचे रूंदीकरण करण्यासाठी पंधरा दिवसांत सर्व विभागांची बैठक घेउन उपाययोजना करण्याचे देण्यात आलेले आश्वासन हवेत विरल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने नारायणगव्हाणकरांच्या तोंडाला पाने पुसली आहेत.**



**रस्ता रूंदीकरणासाठी आंदोलन केल्यानंतर बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी पंधरा दिवसांत कार्यवाही करण्याचे दिलेले आश्वासन न पाळल्याने ग्रामस्थांमध्ये फसवणूक झाल्याची भावना निर्माण झाली आहे. ग्रामस्थांच्या सुरक्षेसासाठी झोपलेल्या प्रशासनास जागे करण्यासाठी मागील निवेदनाची प्रत जोडून नव्याने जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी संजय भावसार तसेच इतर विभागांना स्मरणपत्र देण्यात येऊन आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.**

**सचिन शेळके, शरद पवळे**
**ग्रामस्थ**

२ जानेवारी रोजी रस्त्याच्या रूंदीकरणासाठी ग्रामस्थांनी गाव बंद ठेऊन रस्ता रोको आंदोलन पुकारले होते. सुपा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी मध्यस्ती करीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत ग्रामस्थांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत पंधरा दिवसांत सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांची एकत्रीत बैठक घेऊन हा प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले होते. मात्र पंधरा दिवस उलटूनही काहीही कार्यवाही न झाल्याने संतप्त ग्रामस्थांनी दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी करीत येत्या १ फेब्रुवारी रोजी नगर पुणे महामार्गावर चक्का जाम आंदोलनाचा इशारा दिला आहे.

हा रस्ता अरूंद असल्याने वारंवार अपघात होत असून ग्रामस्थांना जीव मुठीत धरून जगावे लागत आहे.पंधरा वर्षांपासून ग्रामस्थ या समस्येचा सामना करीत असून अधिकारी मात्र केवळ आश्वासने देऊन ग्रामस्थांची बोळवण करीत आहेत.

# संतोष खामकर शिक्षक परिषदेचे प्र. जिल्हाध्यक्ष दत्तात्रेय गवळी प्र. सरचिटणीस




■ शिक्षक परिषदेच्या प्र. जिल्हाध्यक्षपदी संतोष खामकर तर प्र. सरचिटणीसपदी दत्तात्रेय गवळी यांनी नियुक्ती करण्यात आली.कार्यकर्ते

सुपा : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या प्र. जिल्हाध्यक्षपदी संतोष खामकर तर प्र. सरचिटणीसपदी दत्तात्रेय गवळी यांनी नियुक्ती करण्यात आली. मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या राज्य कार्यकारणीची बैठक परिषदेचे संस्थापक आमदार संजय केळकर यांच्या उपस्थितीत पुणे येथे पार पडली. या बैठकीत नव्याने जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली.**

परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, नाशिक विभागीय अध्यक्ष राजेंद्र जायभाय व सर्व राज्य कार्यकारणी सदस्यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत शिक्षक नेतेपदी नव्याने विकास डावखरे यांची नियुक्ती करण्यात आली. प्र. कार्यकारी अध्यक्षपदी दशरथ ढोले यांची नियुक्ती करण्यात आली.

शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आ. संजय केळकर व शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढील काळात सर्व समाज घटकांना सोबत घेवून नगर जिल्हयातील सर्व प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यावर भर देण्यात येणार असल्याचे प्र. जिल्हाध्यक्ष संतोष खामकर यांनी सांगितले.

शिक्षक परिषदेचे काम मध्यंतरीच्या कालखंडात काही कारणास्तव थांबले होते. यापुढील काळात स्वाभिमानी व निष्ठावान कार्यकर्त्यांना सोबत घेऊन हे संघटन मजबुत करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे विकास डावखर यांनी सांगितले. स्वाभिमानी कार्यकर्त्यांबरोबर यापुढील संघटन वाढविण्यात येणार असल्याचे राजेंद्र पटेकर यांनी सांगितले.

राज्यातील प्राथमिक शिक्षकांचे अनेक प्रलंबित प्रश्न शिक्षक परिषदेच्या माध्यमातून मार्गी लावण्यात येत आहेत. यापुढील काळातही शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटीबध्द असल्याचे दत्तात्रेय गवळी यांनी सांगितले. खामकर व गवळी यांच्या निवडीबद्दल बाबुर्डीचे सरपंच प्रकाश गुंड, उपसरपंच छायाताई दिवटे, सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com